बाह्यमाध्यमांद्वारे (Outdoor Media) जाहिरात व प्रसिध्दी करण्याकरिता एकाधिकार संस्थांच्या अतिरिक्त यादीस व दरास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २२०/३४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २८ ऑगस्ट, २०१९

वाचा :- १. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.प्रदर्शने-२०१९/एकाधिकार/का-६/७७ दि.५/३/२०१९.
२. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.प्रदर्शने-२०१९/एकाधिकार/का-६/१२४ दि.१४/५/२०१९.
३. शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१९/प्र.क्र. १३०/३४ दि.२८ मे,२०१९

प्रस्तावना :-

शासनाच्या ध्येय धोरणांची, विविध जनकल्याणकारी योजनांची/कार्यक्रमांची माहिती व प्रसिध्दी करणे, शासनाच्या विविध योजनांची माहिती जनसामान्यांपर्यत पोहोचविण्याठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत बाह्यमाध्यमांद्वारे (Outdoor Media) जाहिरात व प्रसिध्दी करण्याकरिता ज्या संस्थांकडे शासकीय/निमशासकीय तसेच महामंडळांचे एकाधिकार आहेत तथापि सदर संस्था केंद्र शासनाच्या DAVP च्या यादीवर नाहीत अशा छाननीअंती पात्र ठरलेल्या संस्थांना उपरोक्त येथील क्र.३ च्या दि. २८मे, २०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावामधून पात्र ठरलेल्या अतिरिक्त संस्थांची यादी तयार करुन त्यांचे दर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

उपरोक्त क्र.३ दि. २८-५-२०१९ चा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर सदर निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या संस्थांव्यतिरिक्त प्राप्त झालेल्या प्रस्तावामधून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय स्तरावरील समितीने केलेल्या छाननीमध्ये पात्र ठरविलेल्या खालील संस्था व त्यांचे दर यांना शासन मान्यता देण्यात येत आहे.

बाह्यमाध्यमांद्वारे (Outdoor Media) जाहिरात व प्रसिद्धी करण्याकरिता एकाधिकार असलेल्या अतिरिक्त जाहिरात संस्थांच्या यादीचा तपशील

अ. क्र.	जाहिरात संस्थेचे नाव	पत्ता	दूरध्वनी क्रमांक	माध्यम			निश्चित केलेला दर (प्रति दिन प्र.स्क्वे.फू.)
१	ओम इन्टरप्रायजेस,	जी-१,गार्डन व्हिव बिल्डिग, ५०/५१, ई.एस.पाटनवाला मार्ग, भायखळा, मुंबई-४०००२७.	९३२६३६७५८१ ई-मेल- sanjayom@gmail.com	२५० कि ऑक्स/बॅक लिट		शेगांव	रु.११.००
				LED स्क्रीन (१० फूट X १२ फूट) एकूण १० स्क्रिन			(१५ सेकंदासाठी) रु.१५०
	प्रो ॲक्टीव्ह इन ॲण्ड. आऊट ॲडव्हर्टाझींग प्रा.लि.	समकीत अपार्टमेंटस, बी विंग, ३ रा माळा, संत जनाबाई मार्ग, विले पार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.	०२२-४२११९३००० मो.नं. ९८२१६३२१२१ ई-मेल - pro_active@vsnl.com	बस शेल्टर		पुणे	रु.५.००
				बस शेल्टर (इल्युमिनेटेड		पुणे	रु.१०.००
				बस पॅनल	बॅक	कोल्हापूर	रु.९.००
					लेफट		रु.४.५०
					राईट		रु.३.५०
					इनसाईड		रु.७.०
				पोल कि ऑक्स	नॉन लिट	नवी मुंबई	रु.८.००
					बॅक लिट		रु.१३.००
३	शिवम ॲडव्हर्टायजिंग एजन्सी	फलॅट नं. A-६०२, श्री.गणेश टॉवर्स, भारत नगर, अमरावती रोड, नागपूर-४४० ०३३.	०७१२-२५४०५७३ मो.नं.९८२३१६९४३७ ई-मेल- shivamad.ngp@gmail.com	इलेक्ट्रॉनिक साईन बोर्ड		५९१ बस स्टॅण्डस	रु.१८०.०० (८ फुट X ४ फुट प्रति बोर्ड/ १५ सेकंदासाठी

२. **सदर संस्थांची कार्यपध्दती उपरोक्त क्रमांक ३ येथील दि.२८.५.२०१९ च्या शासन निर्णयाप्रमाणे मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.**

३. उपरोक्त क्र.३ येथील दि. २८.५.२०१९ च्या शासननिर्णयामध्ये :-

अ) मे. अभिक ॲडव्हर्टायझींग प्रा.लि., अहमदाबाद यांचे माध्यम या तक्यामध्ये एचपीसीएल पेट्रोल पंप च्या समोर अनावधाने "पुणे" असा उल्लेख झाला असून तिथे "पुणे" ऐवजी **"जिल्हा पातळी"** असे वाचावे.

ब) मे. राकेश ॲडव्हर्टायझींग प्रा.लि. अधेंरी (वेस्ट),मुंबई या संस्थेंने बेस्ट बस पॅनल (लेफ्ट साईड, राईट साईड पॅनल, बॅक पॅनल) याचे एकाधिकार आता मे. साईन पोस्ट इंडिया लि. मुंबई या संस्थेकडे देण्यात आले आहे. त्यामुळे मे.राकेश ॲडव्हर्टायझींग,मुंबई या संस्थेचे बेस्ट बस पॅनल या माध्यमासाठीचे नाव बदलून **मे.साईन पोस्ट, मुंबई** असे वाचावे.

४. सदर यादी व दर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पुढील दोन वर्षासाठी किंवा नवीन यादी तयार करेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यत अस्तित्वात राहील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२८१५४८०९९४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2019.08.28 17:07:21 +05'30'

(रा. ना. मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
६. सर्व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
७. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), मुंबई, नागपूर
९. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई, नागपूर
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११.उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२.माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत संबंधित संस्था
१३.उप संचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१४.निवड नस्ती कार्यासन ३४ /साप्रवि.